# कुलाबा-वांद्रे-सीप्झ मेट्रो, ५३.७८ किमी काम पूर्ण

## पहिल्या टप्प्यात १०० टक्के भुयारीकरणाचे लक्ष्य

लोकमत न्यूज नेटवर्क

मुंबई : मुंबई मेट्रो रेल कॉर्पोरेशनने मंगळवारी कुलाबा-वांद्रे-सीप्झ मेट्रो-३ मार्गावरील मुंबई सेंट्रल मेट्रो स्थानक भुयारीकरणाचा ४१वा टप्पा यशस्वीरीत्या पूर्ण केला. या प्रकल्पाचे आतापर्यंत एकूण ५३.७८ किमी म्हणजेच ९८.६० टक्के भुयारीकरण पूर्ण झाले आहे. दरम्यान, मेट्रो-३च्या पहिल्या टप्प्याचे १०० टक्के भुयारीकरण पूर्ण करण्याचे लक्ष्य मेट्रोने समोर ठेवले आहे.

तानसा-२ या रॉबिन्स बनावटीच्या टनेल बोअरिंग मशीनद्वारे महालक्ष्मी मेट्रो स्थानक ते मुंबई सेंट्रल मेट्रो स्थानक हा डाउन-लाइनमार्गाचा ८३२.५ मी. भुयारीकरणाचा टप्पा एकूण ५५५ रिंग्सच्या सहाय्याने २६२ दिवसांत पूर्ण झाला. मेट्रो-३ मार्गिकेतील पॅकेज-३ मध्ये पाच स्थानके असून हा या मार्गिकेतील सर्वात लांब टप्पा आहे. या अंतर्गत मुंबई सेंट्रल, महालक्ष्मी, सायन्स म्युझियम, आचार्य अत्रे चौक आणि वरळी मेट्रो स्थानकांचा समावेश आहे. आतापर्यंत पाच भुयारीकरणाचे टप्पे पूर्ण झाले आहेत, अशी माहिती एमएमआरडीएचे महानगर आयुक्त, मुंबई मेट्रो रेल कॉर्पोरेशनचे व्यवस्थापकीय संचालक एस. व्ही. आर. श्रीनिवास यांनी दिली.